# भूगोल विभाग अहवाल

लोक महाविद्यालयात भूगोल हा विषय २००६-०७ या शैक्षणिक सत्रात अभ्यसाला जातो. भूगोल या विषयाचे व्यवहारीक महत्व लक्षात घेता हा विषय विद्यापीठ स्तरावर शिकवीला जातो. आपण ज्या वातावरणात राहतो त्याच्या बद्दलचे कुतुहम नेहमीच आपल्याला राहीले आहे. पृथ्वीची निर्मीती, वातावरण, जलावरण, तापमानात होणारी वाढ, घटते पर्जन्य, लोकसंख्या वाढ, प्रदुषण अशा अनेक बाबी आपल्या रोजच्या जीवनात पाहायला मिळतात. त्याच अनुषंगाने हा विषय पदवी /बी.ए. च्या अभ्यासक्रमात अत्यंत महत्वपूर्ण आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर यांच्या अभ्यासक्रमानुसार सत्र २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षात बी.ए. भाग १ सेम-१ भुगोलशास्त्राची ओळख, सेम-२ हवामानशास्त्र ला भूरुपशास्त्र, बी.ए. भाग २, सेम-३ भूरुपशास्त्र, सेम-४ मानवी भूगोल बी. ए. भाग ३, सेम-५ महाराष्ट्राचा भूगोल, सेम-६ भारताचा भूगोल ह्या विषयाचे अक्ष्यापन करण्यात आले. भूगोल विषया अंतर्गत भूगोल अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. भूगोल अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून प्रविण चिकनकर तर सचिव म्हणून प्राची पाटील यांची निवड करण्यात आली. सदर बैठकीला विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांना मा. सौ. पुष्पा तायडे प्राचार्या. लोक महाविद्यालय, वर्धा यांनी मार्गदर्शन केले.

भूगोल हा विषय प्रात्यक्षिक स्वरूपाचा असल्याने विद्यार्थ्यांना या विषयाची गोडी निर्मान व्हावी व हा विषय जास्तीतजास्त प्रसिध्दिस यावा याकरीता या वर्षेत शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आली. सदर शैक्षणिक सहल कोकण दर्शन करण्यासाठी नेण्यात आली. सदर सहल दि. १२ फेब्रुवारी २०१९ ते १६ फेब्रुवारी या कालावधीमध्ये घेण्यात आली. यात नांदेड, कोल्हापूर, गणपतीपुळे व औरंगाबाद या स्थळांना भेटी दिल्या.

अभ्यासक्रमाचा भाग म्हणून बी.ए. भाग ३ च्या विद्यार्थ्यांना गावाचा सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण करावयाचा असतो त्याअनुषंगाने आम्ही वायनाव (नि.) या गावाची निवड केली. दि. २० एप्रिल २०१९ ला वायनाव (नि.), ता. वर्धा, जि. वर्धा या गावाला विद्यार्थ्यांना नेऊन तेथील ७० कुटुंबाचे सर्वेक्षण करण्यात आले.

वरिल सर्व उपक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. पुष्पा तायडे, लो.शि.प्र.मंडख चे मा. अध्यक्ष व सर्व पदाधिकारी तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

प्रा. पंकज दि. गोरडे

भूगोल विभाग प्रमुख

लोक महाविद्यालय, वर्धा